॥ सा विद्या या विमुक्तये ॥

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | Public Relations Office (PRO) | website: srtmun.ac.in

Phone: (02462) 215325 | जनसंपर्क कार्यालय | E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२३-२४/१४६ दि.१७/०९/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठाचा ३० वा वर्धापनदिन उत्साहात साजरा



हैदराबाद मुक्ती संग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ३० व्या वर्धापनदिनानिमित्त दि. १७ सप्टेंबर रोजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते प. पूज्य स्वामी रामानंद तीर्थ यांच्या पूर्णाकृती पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यात आला. सकाळी ०८:०० वा. राष्ट्रीय ध्वजारोहण आणि ०८:०५ वा. विद्यापीठ ध्वजारोहण कुलगुरू महोदयांच्या हस्ते संपन्न झाले. यानिमित्त राष्ट्रगीत, महराष्ट्रगीत आणि विद्यापीठ गीताचे गायन करण्यात आले. याबरोबर विद्यापीठाच्या स्वागत कक्षामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केशव सीताराम उर्फ प्रबोधनकार ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी कुलगुरूंनी उपस्थितांना वर्धापनदिनानिमित्त शुभेच्छा देत विद्यापीठाची विकासाच्या दृष्टीने होत असलेली वाटचाल यावर थोडक्यात माहिती दिली. यावेळी डॉ. ओमप्रकाश येमूल यांच्या संशोधनपर कार्यानिमित्त पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यातआला. अधिष्ठाता डॉ. पराग खडके यांना ७५ लक्ष रुपयांचा निधी संशोधनासाठी शासनाकडून मिळाल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला. वाहन चालक दिनानिमित्त विद्यापीठातील सर्व वाहन चालकांना कुलगुरू डॉ. मनोहर चासकर व मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून सन्मान करण्यात आला.

यावेळी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. शशिकांत ढवळे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. डी. एम. खंदारे, विशेष कार्यासन अधिकारी डॉ. डी.एम. नेटके, वित्त व लेखाधिकारी महोम्मद शकील, मा. व्यवस्थापन परिषद सदस्य इंजिनीअर नारायण चौधरी, मा. अधिसभा सदस्य, मा. विद्यापरीषद सदस्य, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, मानव्य विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग खडके, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. चंद्रकांत बाविस्कर, दूरशिक्षण विभागाचे संचालक डॉ. विनायक जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मलीकार्जुन करजगी, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. भास्कर माने, ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांच्यासह विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन माध्यमशास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र गोणारकर यांनी केले तर राष्ट्रगीत ललित व कला संकुलाच्या विद्यार्थ्यांनी गायीले.